# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 03/11/2017 रोजी (का.प.क्र.12) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक 03 नोव्हेंबर 2017 रोजी (का.प.क्र.12) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-30 वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर,नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.सौ.राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
11. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
12. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.सिताराम सुरे :सन 1991च्या डिपी प्लॅननुसार 36 मीटरचा रस्त्याचा समावेश झालेला आहे. या रस्त्याचा विकास करण्यात यावा. मा.न्यायालयाकडुन मला नोटीस जारी झालेली आहे. रस्त्यासंदर्भात वेठीस धरण्यात येतो म्हणुन समन्स बजावला आहे. दि. 23.10.2017 रोजी हजर झालो असता पुढील तारीख वाढुन देण्यात आलेली आहे. लोकप्रतीनिधीचे कामे हे विकासासंदर्भात प्रश्न मांडणे हा आहे. समन्स जारी केला आहे याचे कारण काय?

मा.सभापती :माहिती देण्यात यावी. वैयक्तिक पातळीवर त्यांचा काही संबध नाही.

विधी सल्लागार :सदरील प्रकरणात प्रतिवादी केलेले आहे. मा.न्यायालयाच्या निदर्शनास हि बाब आणली जाईल की, स.सदस्य पार्टी नसतांना त्यांना विनाकारण गोवण्यात आलेले आहे.

मा.सभापती : या प्रकरणी मा.न्यायालयाच्या निदर्शनास हि बाब आणुन देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : सर्वे नंबर 157/7 हि जागा मनपाकडे हस्तांतरण झालेली आहे का?

सहाय्यक संचालक न.र.:रेकॉर्ड तपासुन माहिती देण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे :काही नागरीक त्या ठिकाणी रस्त्यासाठी खोडा घालत आहे. गेल्या पाच दिवसांपासून काम बंद आहे. कोणत्याही अधिकाऱ्याचे त्या ठिकाणी लक्ष नाही.

मा.सभापती :याबाबीची दखल प्रशासनाने घ्यावी, त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :कंचनवाडी येथील एसटीपी प्लॅन्ट चालु झाला असुन 60 एमएलडी पाणी फिल्टर होत आहे. प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे:भुमिगत गटार योजनेचा ऑडीट अहवाल सादर झाला, प्रकल्प प्रमुखांना एकाही प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. पीएमसीला ब्लॅकलीस्ट करण्यासंदर्भात, किंवा प्रकल्प प्रमुख

यांना निलंबित करणे संदर्भात असेल प्रशासनाचे यामध्ये काय कार्यवाही केलेली आहे. कारणे दाखवा नोटीस इश्यु केली होती, त्याचे उत्तर काय आले. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :गेल्या आठ ते दहा बैठकीमध्ये स.सदस्यांनी भुमिगतबाबत प्रश्न मांडलेला आहे. प्रकल्प प्रमुख यांचे उत्तर समाधानकारक मिळालेले नाही, याबाबत मी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु त्यांनी सहकार्य केलेले नाही. मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेल्या अहवालावर दोन वेळेस सभागृहात चर्चा झाली. प्रकल्प प्रमुख यांनी समाधानकारक उत्तर व माहिती देवु शकलेले नाही.याबाबत पीएमसीलाही बोललो परंतु समाधानकारक खुलासा पीएमसीनेही केलेला नाही. त्यानंतर सभागृहाने निर्णय घेतला की, प्रकल्प प्रमुख यांना निलंबीत करण्यात यावे. याबाबतचा खुलासा सभागृहात करण्यात यावा.

मा.आयुक्त :भुमिगत गटार योजनेसंदर्भात सभागृहात विविध प्रश्न उपस्थित झाले होते. स.सदस्यांनी काही मुद्दे मांडले होते, त्या मुद्दयांचे समाधानकारक उत्तर दिले नाही म्हणुन तक्रार आली होती. सभागृहात बरीच चर्चा होवुन काही आदेश पारित झाले होते. सभागृहात झालेली चर्चा तसेच मला प्राप्त झालेले पत्र यांची दखल घेवुन लेखापरिक्षण अहवालाची दखल घेवुन संबधीतांना कारणे दाखवा नोटीसा बजावलेल्या होत्या, नोटीसमध्ये 07 दिवसात खुलासा करणे संबधात सांगीतलेले होते, सात दिवसांनंतर संबधीत अधिकारी यांनी सात दिवसांचा अवधी अपुरा आहे. त्यात वाढ करण्याची आवश्यकता आहे. त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती, कालच उत्तर प्राप्त झालेले आहे. संबधीताने केलेले खुलासे विस्तृत प्रमाणात आहे. त्याचा अभ्यास करायला वेळ लागेल, याची तपासणी करण्याचे काम चालू आहे, लेखापरिक्षण अहवालात नमुद केलेले मुद्दे, याची सखोल तपासणी करण्यात येईल, त्यानंतरच आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :योजना चालू झाली तेव्हापासून ते आज पर्यंत विविध सामाजिक संस्थेने अनेक मुद्दे समोर आणुन दिले, मा.मुख्यमंत्री यांना या योजनेबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. प्रशासनाने या योजनेचा लेखाजोखा ठेवला पाहिजे. स.सदस्यांना टेक्निकल नॉलेज नसेलही परंतु ऑडिट विभागाने या योजनेचे ऑडिट केलेले आहे. अहवालात 25 मुद्यांवर अहवाल दिलेला आहे. काही मुद्दे असे आहेत की, त्यावर पुन्हा संधी देणे आवश्यक वाटत नाही. जनतेच्या पैशाचा अपव्यह होवु नये म्हणुन शहरातील विविध प्रश्नांवर मत प्रदर्शत करतो, यावर तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित असतांना विलंब होत आहे. प्रकल्प प्रमुखांच्या असंख्या चुका आहेत त्यांना खुलासा करण्यासाठी अजुन कालावधी लागतो कशासाठी ? सदरील योजना यशस्वी करण्याची जबाबदारी प्रकल्प प्रमुखाची राहील. या योजनेचे अपयश हे पुर्णत: श्री.अफसर सिद्दीकी यांचेवर आहे. असंख्य अनियमितता सभागृहात मांडलेले असतांना यावर कार्यवाही होतांना दिसत नाही. प्रशासनाला पुर्ण अधिकार आहे. जो निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा. परंतु भ्रष्टाचाराला कुठेही पाठीशी घालु नये, यावर कोणती कोणतीही कारवाई होत नाही याची खंत वाटते.

श्रीमती किर्ती शिंदे :जो अहवाल सादर झाला आहे. तो अंतिम नसुन अंतरिम आहे. ज्यावेळी त्रुटी निदर्शनास आल्या त्यावेळी अधिकाऱ्यांशी चर्चा करणे गरजेचे होते, जो पर्यंत पुर्ण कामाचे ऑडीट होत नाही तोपर्यंत अहवाल अंतिम न करता अंतरिम करण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे:सदर योजनेचे आयआयटी, पवई मार्फत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करण्याचे आदेश दिले होते, कार्यवाही करण्यासंदर्भात टाईमबॉन्ड देण्यात यावा. डिसेंबरमध्ये योजना संपणार आहे तसेच श्री.अफसर सिद्दीकी, का.अ. हे मार्चमध्ये सेवानिवृत्त होणार आहे.

श्रीमती मनिषा मुंडे :स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे व स.श्री.राजगौरव वानखेडे यांनी उपस्थित केलेले मुद्दे बरोबर आहेत.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त, :आयआयटी, पवईला पत्र दिलेले आहे. त्यांची कॉस्टींग 44 लाख रूपये आहे, सध्या थर्ड पार्टी इन्स्पेक्शन गर्व्हमेंट इंजिनिअरींग कॉलेजकडुन करून घेण्यात येत आहे. मटेरिअलचे इन्स्पेक्शनही तंत्रज्ञानकडुन करून घेण्यात येत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरील योजनेमध्ये कोटींनी लॉसमध्ये आहे. 44 लाख रूपये जास्त नाही. आयआयटी पवई कडुन इन्स्पेक्शन होणे आवश्यक आहे. येथील संस्थेवर विश्वासअर्हता नाही. असे माझे वैयक्तिक मत आहे.

मा.सभापती :नेहमीच माईक सिस्टीममध्ये समस्या येत आहे, शहर अभियंता यांना आदेशित करण्यात येते की, नविन माईकसिस्टीमची यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी.

शहर अभियंता :सदर योजनेबाबत दोन ते तीन बैठकीत चर्चा चालु आहे, ज्या वेळी मुख्यलेखापरिक्षक यांनी अहवाल सादर केला आहे. त्यावेळेस नियमानुसार सभागृहात अहवाल मांडण्यापुर्वी मेमो रिडींग होणे आवश्यक आहे. प्रत्येक पॅराचे वाचन केले पाहिजे. किती पॅरे वगळले जावु शकतात. याचा स्पष्ट अभिप्राय विभाग प्रमुखाचा घेतला पाहिजे. हि प्रक्रीया यामध्ये झालेली नाही, मलाही यामध्ये कारणे दाखवा नोटीस मिळालेली आहे. अहवालातील बरेचशे पॅरे हे गैरलागु आहेत आणि ते ड्रॉप होण्यासारखे आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे:अहवाल प्रशासनाने तयार केलेला आहे,

श्री.रेणुकादास वैद्य :योजनेमध्ये जे चेंजेस झालेले आहे. त्याचा राज्य शासन किंवा केंद्र शासनाची मंजूरी घेतलेली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे:करारात नमुद आहे, कोणतेही चेजेंस करायचे असल्यास राज्य शासनाची मंजूरी आवश्यक आहे परंतु एकाही चेंजेसमध्ये मंजूरी घेतलेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :एमपीथ्री पाईप वापरू नये म्हणुन जीवन प्राधीकरणाने सांगूनही त्यांचे मत डावलुन काम केलेले आहे. अहवाल हा शासनाच्या अधिकारी यांनी तयार केला आहे, योजनेचे प्रशस्तीपत्र देण्यात यावे की, या योजनेत कुठलाही दोष नाही. योजना चांगल्या प्रकारे चालु आहे. या योजनेमुळे शहराचे महानगरपालिकेचे कुठलेही नुकसान होत नाही. असे अधिकाऱ्यांनी लिहुन देण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे:कारवाई करण्याच्या वेळेस प्रशासन हा खुलासा करीत आहे, प्रकल्प प्रमुखांना मत मांडण्याची पुर्ण संधी दिलेली आहे. त्या वेळेस या गोष्टींचे खंडण का नाही केले.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांची दिशाभुल करण्यात येत आहे, मांडलेल्या मुद्यांपैकी काही मुद्दयांमध्ये तथ्य असेल, प्रकल्प प्रमुखांचे निलंबन करण्यात यावे किंवा पत्रकार परिषद घेवुन योजना चांगल्या पध्दतीने चालू आहे म्हणुन खुलासा करण्यात यावा. ऑडीट करण्यासाठी कागदपत्र/रेकॉर्ड उपलब्ध करून देण्यात आले नाही म्हणुन अहवालामध्ये उल्लेख आहे.

शहर अभियंता :ऑडीट म्हणजे दोष दाखवुन देण्याची एक प्रक्रीया, दोष दुरूस्त करण्याची एक प्रक्रीया आहे.

श्री.राजगौरव वानखेडे:150 कोटीचे काम बाकी आहे, दोन महिन्यात सदर कामे करणार आहेत का?

शहर अभियंता :मेमो रिडींग होणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :अनेक बदलांना राज्य, केंद्र शासनाची परवानगी घेतलेली नाही. हा पॅरा कसा डिलिट होणार आहे खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :काही बदल हे तांत्रिक स्वरूपाचे आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :सहा एसटीपी असतांना चार वर आणले. प्रत्येक ठिकाणच्या एसटीपीची कॅपीसिटी बदलेली आहे.

शहर अभियंता :एसटीपी बदल बाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे. इतिवृत्तामध्ये सर्व बाबी आलेल्या आहेत, व्हिडीओ शुटींगमध्ये आलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे:पीएमसीच्या चुका झालेल्या आहेत, रेल्वेला सात कोटी रूपये भरावे लागत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सदर बाबी हया वरिष्ठ स्तरावर कळविण्यात येईल, शासनाचा पैसा आहे, तो व्यर्थ चालला आहे. श्री.अफसर सिद्दीकी यांना निलंबित करण्यात यावे.

मा.सभापती :मा.आयुक्तांना मी जे पत्र दिलेले आहे, त्याची लवकरात लवकर दखल घ्यावी. अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा. स्थायी समितीने शिफारस केलेली आहे की, श्री.अफसर सिद्दीकी यांना निलंबित करावे व पीएमसीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.सिद्धांत शिरसाट :बनेवाडी येथील शाळेचे भाडे अजुनपर्यंत निश्चित करण्यात आलेले नाही.

उपआयुक्त (प्र) :शिक्षणाधिकारी सुट्टीवर आहेत, याबाबतची माहिती घेवुन सदरील बाबींची माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :आदेशित करण्यात येते की, त्वरीत भाडे देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी. त्या ठिकाणी शिक्षक देण्याची व्यवस्था व्हावी.

श्री.सिद्धांत शिरसाट :रेल्वेस्टेशन येथील पेट्रोलपंप काढणेबाबत वारंवार बैठकीत चर्चा करीत आहे. मा.न्यायालयाचे आदेश आहे.

मा.सभापती :पेट्रोलपंप सिल केलेला आहे, तेथील अतिक्रमण काढणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):1998 च्या रिटपिटीशनमध्ये हायकोर्टाने आदेशित केलेले आहे. सदरील जागा मनपाने खरेदी केलेली आहे. कागपत्र जमा केलेले आहे. नो ऑब्जेक्शन सर्टीफिकेट, हे सर्व झालेले आहे, मार्कींग संदर्भांत नगर रचना विभागास पत्र दिलेले आहे.

स.स.न.र. :मार्कींग यापुर्वी करण्यात आलेली आहे, पुन्हा मार्कींग पाहिजे असल्यास करून देण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट :संबधीत पेट्रोल मालक पंप वाचविण्यासाठी मा.न्यायालयात गेलेला आहे.मार्कींग झालेली आहे, अतिक्रमण काढण्यात यावे. निश्चित किती दिवसात अतिक्रमण काढण्यात येणार आहे, खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :कुठलिही समस्या नसतांना अतिक्रमण काढण्यास काय समस्या आहे.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):आदेशित करत असाल तर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट :अतिक्रमण काढण्याचे आदेश मा.आयुक्त यांनी उपआयुक्त (प्र) यांना दिले होते.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबत त्वरीत काय कार्यवाही करता येईल ती करावी.

मा.आयुक्त :धार्मिक स्थळ प्रकरणांत सदरील प्रकरण उपआयुक्त(प्र) यांचेकडे दिला होते, सदरील प्रकरण अतिक्रमण विभागात हस्तांतरण करून तीन दिवसात अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.सिध्दांत शिरसाट :हॉलिडे कॅम्प येथील अतिक्रमण काढण्यात यावे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):भुसंपादनाची कार्यवाही करावी लागेल. नगर रचना विभागाने मार्कींग केल्यास अतिक्रमण काढण्यात येईल.

मा.आयुक्त :नगर रचना विभागाकडुन मार्कींग करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट :वारंवार मी सभागृहात जे मुद्दे मांडलेले आहेत त्यावर कार्यवाही न झाल्यास आंदोलन करण्यात येईल. पर्यटन कक्षाच्या जवळ असलेले मटनमार्केट शिफ्ट करण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :दिल्ली गेट येथील बीएफसी शाळेने तलावात 100 फुट भरती टाकुन अतिक्रमण केलेले आहे. त्या ठिकाणी सुशोभिकरणाचे काम चालू आहे, संबधीतांनी वॉल कंपाऊंड केलेले आहे.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):सलिम अली सरोवर येथील अतिक्रमण काढुन टाकलेले आहे, सध्या कंपाऊंड वॉलचे अतिक्रमण आहे, त्याचेकडे पीआरकार्ड आहे, संबधीतांना नोटीस दिलेली आहे. अतिक्रमण काढायचे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.जयंत खरवडकर यांची बदली अतिक्रमण विभागात झालेली आहे परंतु ते रूजू झालेले नाही, खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :श्री.जयंत खरवडकर यांची पदनिर्देशित अधिकारी व नगर रचना विभाग, अतिरिक्त कार्यभार दिनांक 13.04.2017 ला सोपविण्यात आलेला आहे. पदनिर्देशित अधिकारी या पदावर रूजू झालेले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :रूजु न झाल्यामुळे प्रशासनाने कोणती कारवाई केलेली आहे. सदरील अधिकारी यांची नगर रचना विभाग सोडुन इतरत्र बदली झाल्यास ते सुट्टीवर जातात नाहीतर रुजूच होत नाही. काय कारवाई करणार याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.अजीम अहमद :श्री.संजय पवार हे अधिकारी वार्डात रूजूच झालेले नाही. वार्डातील कामांमध्ये समस्या निर्माण होत आहे. संबधीत अधिकारी यांना लेखा विभागातच बदली हवी आहे.

मा.सभापती :याबाबत योग्य तो निर्णय प्रशासनाने ताबडतोब घेण्यात यावा.

मा.आयुक्त :पदस्थापना केव्हा झाली कधी झाली याबाबतचे कागदपत्र तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सय्यद मतीन :समान पाणीवाटप संदर्भात मा.सभापती यांनी रूलिंग दिली होती त्या संदर्भात खुलासा करण्यात यावा. जुन्या शहराला चार दिवसाआड पाणी येत आहे.

मा.सभापती :बैठकीत आदेशित करण्यात आले होते की,दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू):पाण्याच्या टाक्या आहे त्या प्रमाणे समान पाणी पुरवठा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. हत्तेसिंगपूरा येथील पाण्याची टाकीची सफाई चालू आहे 15 दिवस पाणीपुरवठा करण्यासाठी लागणार आहे.

मा.सभापती :पाणीपुरवठा करणे संदर्भात योग्य नियोजन करून कार्यवाही करण्यात यावी.

श्री. सय्यद मतीन :नारेगांव, मिसारवाडी भागात पाण्याची लाईन नाही, या ठिकाणी नळ कनेक्शनकरीता मधला मार्ग काढण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू):शहरात 40 भाग हा गुंठेवारीचा आहे. ज्या ठिकाणी नळ कनेक्शन नाही त्या ठिकाणी टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात येतो.

श्रीमती संगीता वाघुले :परिस्थितीने गरीब असलेले नागरीक 30 रूपयांनी एक ड्रम पाणी घेवु शकत नाही.

श्री. सय्यद मतीन :टाऊन हॉल ते मकाई गेट रस्ता रूंदिकरणात बाधीत नागरीकांना दोन लाख रूपये मोबदला देण्यात आला. परंतु मुस्लिम समाजाच्या नागरीकांना मनपा फंडातुन 75 हजार रूपये देण्यात आले. या पैशांमध्ये घर तयार होत नाही. आणखी एक लाख 25 हजार रूपये देण्यात यावे. एकुण 11 कुटूंबाची ही समस्या आहे.

कार्यकारी अभियंता (घरकुल):लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेचा लाभ दिलेला आहे. जे नागरीक या योजनेच्या गाईडलाईनमध्ये बसत नाही,त्यांना मा.सर्वसाधारण सभेने घेतलेल्या ठरावाच्या अनुषंगाने मदत दिलेली आहे. 11 कुटूंबाची समस्या आहेत.

मा.सभापती :पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात यावा. यावर निर्णय घेण्यात येईल.

श्री.सय्यद मतीन :शिक्षकांसंदर्भात अहवाल सादर करण्यासंदर्भात आदेशित केले होते, अहवालाची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :अहवाल तात्काळ सादर करण्यात यावा.

श्री.अजीम अहमद :शाळेवर सुरक्षा रक्षकांची नेमणुक केलेली नाही.

मा.सभापती :ज्या ठिकाणी गरजेचे आहे, त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक देण्यात यावे.

श्रीमती मनिषा मुंडे :शहरात किती टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो. याविषयी सविस्तर माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :या विषयाचा अहवाल पुढील सभेत सादर करण्यात यावे.

श्रीमती संगीता वाघुले :मिसारवाडी, आरतीनगर येथे नविन बालवाडी झालेली आहे. विनामानधन शिक्षीका आहे, गेल्या वर्षभरापासून त्या शिक्षीका विद्याथ्यांना शिक्षण देत आहे. विद्यार्थी संख्या 705 वर गेलेली आहे त्यांचा मानधनाचा प्रश्न सोडविण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्रीमती स्वाती नागरे:वार्ड नंबर 4 मध्ये वार्ड कार्यालयाच्या समोर अतिक्रमण झालेले आहे, रस्त्यांवर भाजी मंडईचे अतिक्रमण झालेले आहे, ते काढण्यात यावे.

मा.सभापती :शहरात सर्वच ठिकाणी सदरील प्रश्न गंभीर बनलेला आहे. अतिक्रमण विभागात पुरेसा स्टाफ नाही. या गोष्टींची दखल घेवुन आवश्यक त्या ठिकाणी कारवाई करण्यात यावी.

श्रीमती राखी देसरडा :राजहाईटस् ते द्वारकादास श्यामकुमार दुकान, मोतीवाला नगर ते संजय नगर पर्यंत भुमिगत अंतर्गत पाईप टाकण्याचे काम करण्यात आलेले आहे परंतु सदरील रस्त्यावर करण्यात आलेले डांबरीकरण पुर्णपणे उखडलेले आहे. रस्त्याची पाहणी करून रस्ता तातडीने दुरूस्त करण्यात यावा.

वार्ड अभियंता :काम सुरू करण्यात आलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :अमृत योजनेअंतर्गत 1 कोटी 50 लाख तसेच 95 लाखाचे टेंडर अद्यापपर्यंत उघडण्यात आलेले नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :लेखा विभागातुन मान्यतेसाठी संचिका आलेल्या आहे. टेक्निकल बीड ओपन केलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शासन सदरील निधी आपणाला देत आहे त्याचा विनियोग योग्यरितीने झाला पाहिजे.

मा.सभापती :प्रशासनाने याची दखल घेवुन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मालमत्ता कराच्या सर्वेक्षणाबाबतची निविदा लवकरच काढणार म्हणुन वर्तमानपत्रामध्ये वाचण्यात आले. मालमत्ता कराची निवीदा यापुर्वी झालेली आहे. आजच्या स्थितीला जे रेट मागविण्यात येत आहे व मागील तीन वर्षापुर्वीच्या निविदेतील रेटस् याचा गॅप खुप मोठा असेल, याचा अतिरिक्त बोझा प्रशासनावर पडेल. नविन निविदा काढण्यापुर्वी संबधीतांना चर्चेसाठी बोलावुन घेण्यात यावे. संचिकेची पाहणी करण्यात यावी. दोन ते अडीच वर्षाचा विलंब झालेला आहे. दरवर्षी 150 कोटी याप्रमाणे दोन वर्षाचे नुकसान झालेले आहे.

मा.सभापती :जो मुद्दा स.सदस्यांनी उपस्थित केला आहे याची दखल प्रशासनाने घ्यावी. मागील निविदेचा विचार करून पुढील कार्यवाही करावी.

श्री.सिध्दांत शिरसाट :बीड बायपास येथील सर्व्हिस रोड बाबत प्रत्येक बैठकीत चर्चा करीत आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):बीड बायपास येथील दोन्ही बाजुचे 15 मीटरचा सर्व्हिस रोडवरील 138 मालमत्ता बाधीत होत आहे. त्यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. या नोटीसच्या विरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या, मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार संबधीतांची सुनावणी घेवुन आक्षेप निकाली काढावे म्हणुन सांगण्यात आले त्यानुसार संबधीतांची

सुनावणी घेण्याची कार्यवाही चालू आहे. हातगाडया असतात त्या हातगाडया नियमित काढण्याची कार्यवाही करण्यात येते.

श्री.सय्यद मतीन :ब्रीजवाडी येथील अतिक्रमण काढण्यात यावे व कंम्पाऊंड वॉल करण्यात यावे.

श्रीमती स्वाती नागरे :औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 1 ते 9 येथे खाजगी कंत्राटदारामार्फत प्रत्येक वार्डात 10 कर्मचारी वसुली करण्याकरीता देण्यात आलेले आहे. सदरील कर्मचारी चांगले काम करीत असुन वार्डाचा व्याप पाहता सदरील कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे. आणखी प्रत्येक प्रभागाकरीता अतिरिक्त 05 कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावा जेणे करून वसुलीचे काम चांगल्या प्रकारे होईल.

श्रीमती संगिता वाघुले :अतिरिक्त कर्मचारी देण्यात यावे.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :वसुली करण्याकरीता प्रत्येक प्रभागात 5 कर्मचारी अतिरिक्त कर्मचारी देण्यात येतील.

मा.सभापती :वसुली करण्याकरीता अतिरिक्त कर्मचारी देण्यास मंजूरी देण्यात येते.

श्रीमती किर्ती शिंदे :सांस्कृतिक मंडळ येथील रस्त्यावरील ड्रेनेज कायम फुटलेले असते यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. अधिकारी कर्मचारी यांचे पाहणीत येत नाही का?

मा.सभापती :दिनांक 11.10.2017 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेमधील ठराव क्रमांक 130 अन्वये गुरूनानक इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड (GNI) या कंपनीस ब्लॅकलिस्ट मधुन वगळण्याचा निर्णय घेतलेला आहे, परंतु संबधीताने स्थायी समितीकडे जे अपील दाखल केले होते त्यामध्ये GNI ने मा.न्यायालयात अपील केले आहे, याबाबतची माहिती स्थायी समितीकडे दिलेली नव्हती, कंपनीस ब्लॅकलिस्ट करण्याबाबतचा जो निर्णय घेण्यात आला तो स्थगीत करण्यात येत आहे. मा.न्यायालयाचा निर्णय आल्यानंतरच यावर निर्णय घेण्यात येईल, कृपया याची दखल विधी सल्लागार यांनी घ्यावी, तसे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणुन द्यावे.

**विषय क्र. 132 : (कार्य.अभि.4,5,6,7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.101, एकतानगर, फुलेनगर स्लम भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.49,98,683/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.49,98,683/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.101, एकतानगर, फुलेनगर स्लम भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,98,683/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 : (कार्य.अभि.4,5,6,7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.06 अंतर्गत वार्ड क्र.86 ते 92 आणि विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.33,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.33,00,000/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती                    : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.06 अंतर्गत वार्ड क्र.86 ते 92 आणि विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.33,00,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 134 : (मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सिडको, एन-7 येथील रिलायन्स पेट्रोल पंप मागील पडीत असलेल्या रिक्त जागेत डेली निडस्, महानंद दुध विक्री केंद्रासाठी 4x6 या आकाराची जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी श्री.अनिल भिकन बनकर यांनी विनंती केली असता, त्यास सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे भाडे आकारणी नुसार वार्षिक भाडे रू.4523/- ऐवढी आकारणी करून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 134 व 135 बाबत महानगरपालिकेची एकत्रित पॉलिसी असली पाहिजे. या विषयांना आमचा विरोध नाही. एका वार्डात मंजूरी देण्यात येते, दुसऱ्या वार्डात मंजूरी देण्यात येत नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचा निर्णय आहे म्हणुन सांगण्यात आले होते की, रस्त्यालगत महानगरपालिकेला जागा देता येत नाही. विषय पत्रिकेत नमुद केलेले प्रस्तावाच्या जागा कुठे आहेत.

मालमत्ता अधिकारी :रस्त्यालगत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचा निर्णय यांना लागू होत नाही का?

मालमत्ता अधिकारी:सदरील विषय रस्त्याच्या बाधीत होणाऱ्या जागे व्यतिरिक्त आहे. 9 मीटर ते 45 मीटर रस्त्यावर टपरी अथवा इतर देता येणार नाही असे आहे. विषय पत्रिकेवर असलेला विषय हा 9 मीटर ते 45 मीटर रस्त्याच्या व्यतिरिक्त जागेवर आहे.

मा.सभापती :विषय क्रमांक 134 स्थगीत करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 135 : (मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सिडको, एन-7 आयोध्यानगर येथील अस्मिता पार्क शेजारील खुल्या जागेत डेली निडस्, महानंद दुध विक्री केंद्रासाठी 4x6 या आकाराची जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी श्री.पंडीत सुर्यकांत जोशी यांनी विनंती केली असता, त्यास सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे भाडे आकारणी नुसार वार्षिक भाडे रू.3588/- ऐवढी आकारणी करून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 135 स्थगीत करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 136 : (कार्य.अभि.झोन क्र.4 ते 7 व 9)**

विषय : वॉर्ड क्र.95 शिवनेरी कॉलनी अंतर्गत गुंठेवारी भागात कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.2826606/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-183343-5 सन 2016-2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता झोन क्र.4 ते 7 व 9 कार्यालय. |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.95 शिवनेरी कॉलनी अंतर्गत गुंठेवारी भागात कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 2966849.00/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 2826606.00/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर व दरपत्रक |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 13/01/2017 ते 20/02/2017 पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 22/02/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | सदर कामासाठी तीन वेळेस निविदा मागविण्यात आले असता एक निविदा प्राप्त झाली. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट | 2826606.00/- | अंदाजपत्रकीय कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.2826606.00/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्रमांक 136 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.95 शिवनेरी कॉलनी अंतर्गत गुंठेवारी भागात कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेले निविदाधारक मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.2826606/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 137 : (कार्य.अभि.झोन क्र.4 ते 7 व 9)**

विषय : झोन क्र.04 अंतर्गत वार्ड क्र.1,2,3,4,5,6 व 11 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे./श्री.मोहंम्मद अहेमद सिद्दीकी यांचेकडून 7.67% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,94,100/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.-2017-AMCA-232203-12 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता झोन क्र.04 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरी पॅचवर्क करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.49,94,100/- मा.स्थायी समिती ठराव क्र.80, 23/08/2017 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.49,84,082/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 08 सप्टेंबर 2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 22 सप्टेंबर 2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | काकाजी बंडुजी पाथ्रीकर | 4984081.90 | 1.00% कमी दराने |
| 2 | मोहंम्मद अहेमद सिद्दीकी | 4984081.90 | 7.67% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | रस्ते दुरूस्ती पॅचवर्क सन 2017-2018 |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | महानगरपालिका फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | विषयांकित कामासाठी ठेकेदार मोहंम्मद अहेमद सिद्दीकी यांनी 7.67% कमी दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मोहंम्मद अहेमद सिद्दीकी यांचेकडून 7.67% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,01,803/- पर्यंत करून घेणेस आणि स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्रमांक 137 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.04 अंतर्गत वार्ड क्र.1,2,3,4,5,6 व 11 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे./श्री.मोहंम्मद अहेमद सिद्दीकी यांचेकडून 7.67% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,01,803/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 138 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.27 शताब्दीनगर येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,96,979/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग वॉर्ड-03 स्पील पान क्र.31 अनुक्रमांक 66 वर 30.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात वार्ड क्र.27 शताब्दीनगर येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करिता प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,96,979/- चे मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.138.

श्री.रेणुकादास वैद्य : सर्व अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात यावी. कर्मचाऱ्याचा विषय आहे त्यास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती :श्री.प्रदिप वसंत अहिरे, सहशिक्षक यांचा वैद्यकीय परतावाच्या विषयासह ऐनवेळचे सर्व अंदाजपत्रकाचे विषय मंजूर करण्यात येतात. व एक निविदा आहे, त्यासही मंजूरी देण्यांत येते.

श्री.रेणुकादास वैद्य : अंदाजपत्रक व कर्मचाऱ्याचा विषय सोडुन बाकी सर्व विषय स्थगीत ठेवण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे:मालमता विभागाचे होर्डीगचे टेंडर संबधी पुढील बैठकीत सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.

मा.सभापती :एक विषय मा.कोर्टाचा आहे कोर्टाच्या निर्णायाच्या अधिन मंजूर करण्यात येतो.

श्री.रेणुकादास वैद्य :उत्तरानगरी येथील नागरीकांना मुलभुत सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

मा.सभापती :होर्डीगबाबतच्या विषयाबाबत पुढील सभेमध्ये सविस्तर माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.27 शताब्दीनगर येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,96,979/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 139 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करत आहे की, वार्ड क्र.101 अंतर्गत फुलेनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,90,325/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.SCR-Ward-9 पान क्र.72 अ.क्र.33 वरील रक्कम रू.30.00 लक्ष या उपलब्ध तरतुदीमधुन मा.सर्वसाधारण सभा दि.20/07/2017 ठराव क्र.145 अन्वये वळती करण्यात आलेल्या रक्कमेतून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.29,90,325/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.101 अंतर्गत फुलेनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,90,325/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 140 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत सुभेदार रामजीनगर परिसरामध्ये क्रॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.34,98,725/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 मधील वार्ड अंतर्गत (नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग) या लेखाशिर्षा मधुन प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 07/10/2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत सुभेदार रामजीनगर परिसरामध्ये कॉंक्रीट रस्ता तयार करणे, र.रू.34,98,725/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत सुभेदार रामजीनगर परिसरामध्ये क्रॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.34,98,725/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 141 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.35 अंतर्गत सुखना नदी नाल्यासाठी RCC भिंत व स्मशानभूमीस कॉलमबिमसह संरक्षण भिंत बांधणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.49,95,357/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च सन 2017-2018 या आर्थिक वर्षात प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षामधून प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 10/10/2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी रक्कम रू.49,95,357/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.35 अंतर्गत सुखना नदी नाल्यासाठी RCC भिंत व स्मशानभूमीस कॉलमबिमसह संरक्षण भिंत बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,95,357/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत शंभुनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.29,73,500/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.12/09/2017 अन्वये प्रशासकीय आदेश प्राप्त झाले आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील लेखाशिर्ष भांडवली कामे जलनि:सारण पृष्ठ क्र.SCR-Ward-8-P.No.67 वर अ.क्र.1 वर तरतुद उपलब्ध आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.29,73,500/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत शंभुनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,73,500/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 143 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.59,65,77,78,96 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 42,10,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.22/08/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील रस्ते दुरूस्ती पॅचवर्क वार्ड क्र.07 पृष्ठ क्र.37 मध्ये अ.क्र.02 वर तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.42,10,000/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.59,65,77,78,96 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.42,10,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 144 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.41 रहेमानिया कॉलनी येथील इलियास मस्जिद पासून ते गल्ली नं.11 पर्यंत नाल्याला भुमिगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय र.रू.52,96,636/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील SCR Ward-C पान क्र.37 अनुक्रमांक 23 वर रक्कम रूपये 75.00 लक्ष तरतुद मध्ये उपलब्ध भांडवली कामे जलनिसारण या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या 75.00 लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात भुमिगत गटार बांधुन स्लॅब टाकणे, इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावीत कामाचे र.रू.52,96,636/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.41 रहेमानिया कॉलनी येथील इलियास मस्जिद पासून ते गल्ली नं.11 पर्यंत नाल्याला भुमिगत गटार बांधुन स्लॅब टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.52,96,636/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 145 :**

मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.प्रदीप वसंत अहिरे, सहशिक्षक, के.प्रा.शा. बनेवाडी, महानगरपालिका यांनी स्वतःच्या हृदयाचे तीव्र आजाराचे उपचारापोटी (Actual Interior wall Myocardial Intaraction Angioplasty) रक्कम रूपये 3,05,551/- (अक्षरी रूपये तीन लक्ष पाच हजार पाचशे एकावन्न फक्त) इतका खर्च केला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर आजारपणावर केलेल्या वैद्यकीय खर्च र.रू.3,05,551/- (अक्षरी रूपये तीन लक्ष पाच हजार पाचशे एकावन्न फक्त) एवढा झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रूपये 2,94,501/- (अक्षरी रूपये दोन लक्ष चौऱ्यान्नव हजार पाचशे एक फक्त) एवढी आहे. अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.2,65,050/- (अक्षरी रूपये दोन लक्ष पासष्ठ हजार पन्नास फक्त) इतकी होते. एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.15,275/- (रू.पंधरा हजार दोनशे पंच्च्याहत्तर) (एकूण खर्च रू.3,05,551/- च्या 5% प्रमाणे रू.15,275/-) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,49,775/- (अक्षरी दोन लक्ष एकोणपन्नास हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) देय आहे.

करीता श्री.प्रदीप वसंत अहिरे, सहशिक्षक, के.प्रा.शा. बनेवाडी, महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रू.3,05,551/- च्या 90% रक्कम रू.2,65,050/- च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :वैद्यकीय परतावा देण्यांचा विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.प्रदीप वसंत अहिरे, सहशिक्षक, के.प्रा.शा. बनेवाडी, महानगरपालिका यांनी स्वतःच्या हृदयाचे तीव्र आजाराचे उपचारापोटी (Actual Interior wall Myocardial Intaraction Angioplasty) दाखल केलेल्या वैद्यकीय खर्च र.रू.3,05,551/-(अक्षरी रूपये तीन लक्ष पाच हजार पाचशे एकावन्न फक्त) त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रूपये 2,94,501/- (अक्षरी रूपये दोन लक्ष चौऱ्यान्नव हजार पाचशे एक फक्त) व अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.2,65,050/- (अक्षरी रूपये दोन लक्ष पासष्ठ हजार पन्नास फक्त) एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.15,275/- (रू.पंधरा हजार दोनशे पंच्च्याहत्तर) (एकूण खर्च रू.3,05,551/- च्या 5% प्रमाणे रू.15,275/-) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,49,775/- (अक्षरी दोन लक्ष एकोणपन्नास हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) श्री.प्रदीप वसंत अहिरे, सहशिक्षक, के.प्रा.शा. बनेवाडी, महानगरपालिका यांना अदा करणेस व प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रू.3,05,551/-च्या 90% र.रू.2,65,050/- च्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 146 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.114, 115 मधील रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.46,11,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.06/09/2017 अन्वये अंदाजपत्रकास प्रशासकीय आदेश प्राप्त झाले आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील लेखाशिर्ष रस्ते दुरूस्ती पॅचवर्क पृष्ठ क्र.12 वर दर्शविण्यात आलेले आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.46,11,000/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.114, 115 मधील रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.46,11,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 147 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत नारेगाव युपीएचसी अंतर्गत मिसारवाडी विभागात आरोग्य उपकेंद्र दि.01/01/2017 पासून सुरू करण्यात आलेले आहे. सदर उपकेंद्र श्री.शेख युनूस पिता शेख शब्बीर यांच्या मालकीच्या इमारतीत सर्वे नं.118/2 मधील प्लॉट क्र.34 खुल्या जागेचे क्षेत्रफळ 79.8 व बांधीव क्षेत्रफळ 49.38 चौ.मी. एवढ्या जागेस मालमत्ता विभागाने

भाडे निश्चीती करून दिल्यानुसार रक्कम रू.11,647/- प्रतिमाह प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहे. संबंधीत इमारत मालक श्री.शेख युनूस पिता शेख शब्बीर यांनी दि.01/01/17 पासून प्रतिमाह रू.11,647/- (अकरा हजार सहाशे सत्तेचाळीस रूपये फक्त) प्रमाणे माहे जानेवारी 2017 ते सप्टेंबर 2017 या कालावधीचे एकूण रू.1,04,823/- अदा करण्याबाबत अर्ज सादर केला आहे. सदरील प्रकरणांत मिसारवाडी हे नारेगाव युपीएससी अंतर्गत असल्याने सदरील इमारतीचे भाडे एनयुएचएम अंतर्गत सन 2016-17 एनयुएचएम मंजुर पीआयपी घटक क्र.P.4.3.3.3 Rent (UPHC) रू.9.60 लक्ष अनुदानातून अदा करण्याबाबत शासनास पत्रक पाठवून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. शासनाचे मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत माहे जानेवारी 2017 ते सप्टेंबर 2017 या कालावधीचे इमारत भाडे एकूण रू.1,04,823/- मनपा फंडातून अदा करणे तसेच ऑक्टोंबर 2017 पासून पूढे दरमाह रू.11,647/- भाडे मनपा फंडातून संबंधीत इमारत मालकास मालमत्तेचा ताबा असेपर्यंत अदा करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत नारेगाव युपीएचसी अंतर्गत मिसारवाडी विभागात आरोग्य उपकेंद्र दि.01/01/2017 पासून सुरू करण्यात आलेले असल्यामुळे व सदर उपकेंद्र श्री.शेख युनूस पिता शेख शब्बीर यांच्या मालकीच्या इमारतीत सर्वे नं.118/2 मधील प्लॉट क्र.34 खुल्या जागेचे क्षेत्रफळ 79.8 व बांधीव क्षेत्रफळ 49.38 चौ.मी. एवढ्या जागेस मालमत्ता विभागाने भाडे निश्चीती करून दिल्यानुसार रक्कम रू.11,647/- प्रतिमाह प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यात आलेली असल्यामुळे, संबंधीत इमारत मालक श्री.शेख युनूस पिता शेख शब्बीर यांनी दि.01/01/17 पासून प्रतिमाह रू.11,647/- (अकरा हजार सहाशे सत्तेचाळीस रूपये फक्त) प्रमाणे माहे जानेवारी 2017 ते सप्टेंबर 2017 या कालावधीचे एकूण रू.1,04,823/- अदा करण्याबाबत अर्ज सादर केला असल्याने आणि सदरील प्रकरणांत मिसारवाडी हे नारेगाव युपीएससी अंतर्गत असल्याने सदरील इमारतीचे भाडे एनयुएचएम अंतर्गत सन 2016-17 एनयुएचएम मंजुर पीआयपी घटक क्र.P.4.3.3.3 Rent (UPHC) रू.9.60 लक्ष अनुदानातून अदा करण्याबाबत शासनास पत्रक पाठवून मार्गदर्शन मागविण्यात आलेले असल्याने शासनाचे मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत माहे जानेवारी 2017 ते सप्टेंबर 2017 या कालावधीचे इमारत भाडे एकूण रू.1,04,823/- मनपा फंडातून अदा करणे तसेच ऑक्टोंबर 2017 पासून पूढे दरमाह रू.11,647/- भाडे मनपा फंडातून संबंधीत इमारत मालकास मालमत्तेचा ताबा असेपर्यंत अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 148 :**

विषय :वार्ड क्र.36 ब्रिजवाडी बेडसे कंपनी ते तथागत चौक ते पावरलुम शिवाजी चौक पर्यंत डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.व्हि.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून 4.90% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.47,19,664/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक/Tender ID-2017-AMCA-225102-6

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता झोन क्र.05 सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.36 ब्रिजवाडी बेडसे कंपनी ते तथागत चौक ते पावरलुम शिवाजी चौक पर्यंत डांबरीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/04/2017 विषय क्र.189 अं.प. र.रू.44,99,203/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.44,99,203/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | 1. दैनिक एकमत<br>2. दैनिक सांजवार्ता<br>3. दैनिक मुक्कदस (ऊर्दु) दि.21/06/2017 |

| | | |
|---|---|---|
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 12 सप्टेंबर 2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 16 सप्टेंबर 2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक (01) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा | र.रू.47,19,664/- | 4.90% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय, आठ वेळेस निविदा मागवुनही आठव्या वेळेस अं.प. दरापेक्षा 8.12% जास्त दराची फक्त एक निविदा प्राप्त झाली आहे. संबंधीत ठेकेदाराशी वाटाघाटी करून प्राप्त निविदा दर कमी करून अं.प. दरापेक्षा 4.90% जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार काम तीन आठवड्याच्या आत सुरू करणे आहे. |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्राकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | विषयांकित कामासाठी ठेकेदार मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांनी 4.90% जास्त दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.व्हि.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून 4.90% जास्त दराने म्हणजेच र.रू.47,19,664/- पर्यंत करून घेणेस आणि स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.36 ब्रिजवाडी बेडसे कंपनी ते तथागत चौक ते पावरलुम शिवाजी चौक पर्यंत डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.व्हि.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून 4.90% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.47,19,664/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद